# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

### विद्यार्थिनी कल्याण मंडळ

सकाळ



**मतदार जागृतीचा महाभोंडला...**

राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी महाभोंडल्यात तयार केलेला महाराष्ट्राचा मानवी नकाशा. या माध्यमातून विद्यार्थिनींनी मतदार जागृतीही केली.

(बातमी पान ५ वर)

Pune, District-Today
07/10/2019 Page No. 1

सकाळ

# राजगुरूनगरला विद्यार्थ्यांकडून मतदार जागृती

**राजगुरुनगर, ता. ६ :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण मंडळ व सांस्कृतिक विभागांतर्गत महाभोंडला व रासदांडिया कार्यक्रम करण्यात आला. या वेळी विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्याचा मानवी नकाशा तयार करून 'आपले मत, आपला अधिकार' या घोषवाक्याचा जागर करीत मतदारांमध्ये मतदान जनजागृती केली.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीत विद्यार्थ्यांनी मतदान करून आपला घटनात्मक हक्क बजवावा. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करून लोकशाही मूल्यांचे पालन करावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी या वेळी केले. 'मताची किंमत नाही घेणार, मत मात्र जरूर देणार',

'माझे मत, माझा अधिकार', 'निर्भय होऊन मतदान करा, देशाचा सन्मान करा', 'सोडा सारे कामधाम, मतदान करणे पहिले काम', 'ना जातीवर ना धर्मावर, मतदान करा कामावर', 'चला मतदान करू या, देशाची प्रगती घडवू या' इत्यादी घोषणा विद्यार्थिनींनी दिल्या. त्यानंतर विद्यार्थिनींनी भोंडल्याच्या गाण्यावर फेर धरून रासदांडियाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोळेकर, प्रा. नीता डोंगरे, प्रा. पूनम तापकीर, प्रा. रूपाली वायाळ, प्रा. अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. डी. एम. मारकड यांनी केले.

Pune, District-Today
07/10/2019 Page No. 5

लोकमत

## 'आपले मत-आपला अधिकार' : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विविध कार्यक्रम

# महाभोंडला उपक्रमातून मतदार जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**दावडी :** हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण मंडळ व सांस्कृतिक विभागांतर्गत महाभोंडला व रासदांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचा मानवी नकाशा तयार करून 'आपले मत-आपला अधिकार' या घोषवाक्याचा जागर करीत मतदार जनजागृती करण्यात आली. यात सुमारे १ हजाराहून अधिक विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. जरे यांनी लोकशाही मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थिनी कल्याण मंडळ प्रमुख प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. स्मिता कोळेकर, प्रा. नीता डोंगरे, प्रा. पूनम तापकीर, प्रा. रुपाली वायाळ, प्रा.अपर्णा कुलकर्णी, प्रा. पायल ओसवाल, प्रा.एम.एल. मुळूक, प्रा.डी.एम. मारकड यांनी केले.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचा मानवी नकाशा तयार करून 'आपले मत-आपला अधिकार' या घोषवाक्याचा जागर करीत मतदार जनजागृती करण्यात आली.

◆ **माझे मत-माझा अधिकार, निर्भय होऊन मतदान करा देशाचा सन्मान करा, सोडा सारे कामधाम मतदान करणे पहिले काम, ना जातीवर ना धर्मावर मतदान करा कामावर, चला मतदान करू या, देशाची प्रगती घडवूया, सर्वांचे ऐकून घ्या निर्णय मात्र मनाचा घ्या, मताची किंमत नाही घेणार मत मात्र जरुर देणार आदी घोषणा विद्यार्थिनींनी दिल्या. त्यानंतर विद्यार्थिनींनी भोंडल्याच्या गाण्यांवर फेर धरून रासदांडियाचा आनंद घेतला.**

नवराष्ट्र

# महाभोंडल्यातून मतदान जनजागृती

## विद्यार्थिनींनी घेतला रास दांडियाचा आनंद

**राजगुरुनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विद्यार्थी कल्याण मंडळ व सांस्कृतिक विभागांतर्गत महाभोंडला व रासदांडिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचा मानवी नकाशा तयार करून 'आपले मत, आपला अधिकार' या घोषवाक्याचा जागर करीत मतदान जनजागृती करण्यात आली. यात सुमारे एक हजाराहून अधिक विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.



### मतदान करण्याचे आवाहन

कार्यक्रमाचे उदघाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. यावेळी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एच.एम.जरे, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी विधानसभा निवडणुकीत विद्यार्थ्यांनी प्रलोभनाला बळी न पडता निःपक्ष वातावरणात मतदान करून लोकशाही मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले. 'माझे मत माझा अधिकार, निर्भय होऊन मतदान करा देशाचा सन्मान करा, सोडा सारे काम धाम मतदान करणे पहिले काम,' 'ना जातीवर ना धर्मावर मतदान करा कामावर', 'चला मतदान करू या देशाची प्रगती घडवूया', 'सर्वांचे ऐकून घ्या निर्णय मात्र मनाचा घ्या', 'मताची किंमत नाही घेणार, मत मात्र जरूर देणार' या घोषणा विद्यार्थिनींनी दिल्या. विद्यार्थिनींनी भोंडल्याच्या गाण्यावर फेर धरून रासदांडियाचा आनंद घेतला.

Navarashtra PunePlus Edition
6 Oct, 2019 Page No. 3

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख